# पोलीसांनाही युवकांची मदत

गणेशविसर्जनाच्या वेळी एखादी दुर्घटना घडू नये म्हणून पोलिसांवर मोठी जबाबदारी असते. शहरातील सर्व तलावांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात होता. या पोलिसांना मदतीसाठी काही युवकही पुढे आले होते. युवकांनी साखळीच या ठिकाणी तयार झाली होती. तलावावर जाताना काय काळजी घ्यायला पाहिजे याचे मार्गदर्शनही ते नागरिकांना करत होते. आपल्या संघटनेची ओळख दर्शविणारे टि शर्ट घालून हे विद्यार्थी तलावावर एकत्र आले होते. रात्री ११ वाजेपर्यंत पोलिसांना त्यांनी मदतीचा हात दिला. आजच्या युवकांमध्ये सामाजाप्रती काही करण्याची भावना वाढत आहे, याचे जिवंत उदाहरण गणेश विसर्जनाच्यावेळी तलावांवर पाहायला मिळाले.

